
**Scanned Papers**

**2017-18**

**Dr. P. R. Chavan**



| | | | |
|---|---|---|---|
| ८५ | स्वतंत्र विदर्भाची मागणी : अन्वयार्थ | डॉ. अनुराधा कदम | २३८ |
| ८६ | विदर्भातील स्त्रीगायन परंपरा व योगदान (कालखंड - १९७५ ते आजतागायत) | प्रा. कु. दिपाली एस. राऊत | २४१ |
| ८७ | गोपीनाथराव मुंडे यांचा स्वातंत्र्योत्तर काळातील विदर्भबाबतचा दृष्टीक्षेप | डॉ. बाबासाहेब के. शेप | २४४ |
| ८८ | "विदर्भातील क्रांतीकारी समाजसुधारक संत गाडगेबाबा : ऐतिहासिक विश्लेषण" | प्रा. निशांत भीमरावजी शेंडे | २४७ |
| ८९ | विदर्भाचा सांस्कृतिक वारसा | प्रा. सुवर्णा जवंजाळ | २४९ |
| ९० | वेगळ्या विदर्भाकरिता ब्रिजलाल बियाणी यांचे कार्य | डॉ. कुसुमकेंद्र ग. सोनटक्के | २५१ |
| ९१ | श्री संत गाडगेबाबांच्या प्रबोधन विचारांची प्रासंगिकता | डॉ. माधुरी एन.देवतळे | २५३ |
| ९२ | विदर्भातील धर्मांतर चळवळ | डॉ. प्रमोद रा. चव्हाण | २५५ |
| ९३ | भारतीय इतिहासातील नवे दृष्टीकोन व वऱ्हाडातील पर्यटन | डॉ. प्रशांत प्र. कोठे | २५७ |
| ९४ | स्वातंत्र्योत्तर वैदर्भिय ग्रामीण कविता | रूपेश बाळकृष्णराव फुके | २६३ |
| ९५ | सामाजिक समतेचे अध्वर्यू - राजर्षी शाहू महाराज | डॉ. दिलीपसिंह निकम | २६६ |
| ९६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रिविषयक दृष्टिकोन | डॉ. शहनाज शेख | २६८ |
| ९७ | स्वतंत्र्य विदर्भाची चळवळ | सूनिता दि. श्रीखंडे | २७० |
| ९८ | पश्चिम विदर्भातील धनगर समाजाच्या राजकीय स्थितीचा अभ्यास : अमरावती जिल्ह्यातीलकै. मल्हारराव गणपतराव माहुलकर (माजी आमदार व माजी उर्जामंत्री) यांचे कार्य | डॉ. सुरेशसंतराम माळशिखरे | २७२ |
| ९९ | सौ. नलिनीताई लढके यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान | प्रा. मंजुषा ह. धापुडकर | २७५ |
| १०० | विदर्भातील स्वातंत्र्यचळवळ | डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे | २७७ |
| १०१ | पर्यावरण और आदिवासी | डॉ. रोहिणी यु. देशमख | २८० |
| १०२ | स्वातंत्र्योत्तर काळ : विदर्भातील शेतीप्रश्नावरील काही वैचारिक लेखन | भगवान पांडुरंग फाळके | २८२ |
| १०३ | वेगळा विदर्भ होण्याबाबत अमरावती शहरातील युवकांच्या मतांचे अध्ययन | कु. दिप्ती गोपाल नेहर | २८६ |



*(स्वातंत्र्योत्तर विदर्भाची वाटचाल)* ISBN No. 978-93-83810-96-3

# विदर्भातील धर्मातर चळवळ

प्रा.डॉ. प्रमोद रा. चव्हाण
स.म.स्व.भा.शिगणे महाविद्यालय, खामगांव जि.बुलडाणा

**गोषवारा :-**

ब्रिटीश अधिसत्तेच्या काळात संपूर्ण भारतात सुधारणाचळवळ सुरु झाली. ब्राह्मो समाजापासून सुरु झालेली ही चळवळ तळगळापर्यंत पोहचली त्यामुळे या शोध निबधांचा मुख्य उद्देश म्हणजे स्वातंत्र्यानंतर ही दलित चळवळीचे ऐतिहासिक विश्लेषण करणे व स्वातंत्रोत्तर काळातील दलितांचे प्रश्न व समाजाधील त्याची भूमिका यांचे विश्लेषण करणे व सामाजिक चळवळीचा दलितांच्या एकदरीत राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीत पडलेल्या फरकाचे विवेचन करणे हे प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे.

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये ज्या अनेक धार्मिक सामाजिक चळवळी सुरु झाल्यात त्यामध्ये दलित चळवळीचे स्थान हे अनन्य साधारण असे आहे. ज्या लोकांना एक माणुस म्हणून ही जगण्याचे अधिकार नव्हते, अश्यांना मानव म्हणून जगण्यासाठीची धडपड या चळवळीत दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु झालेली ही चळवळ स्वातंत्र्योत्तर काळाताही बदलली. परंतू ज्या राजकीय सामाजिक व मानवीय हक्कांसाठी ब्रिटीश काळात दलितांना लढावे लागले. तितकी परिस्थिती स्वातंत्र्यांनतर राहिली नाही. मात्र तरी ही प्राप्त झालेल्या अधिकारांचा घटनेच्या चौकटीत राहून दलितांच्या उत्थानासाठी उपयोग करण्याचा मोठा प्रश्न दलित चळवळीसाठी महत्त्वपूर्ण होता. त्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबधांत घेणे क्रमप्रात ठरते.

गोपाळ बुवा कृष्ण वलंगकारापासून सुरु झालेली दलित चळवळ पुढे खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबडेकरांच्या काळात लोक चळवळ झाली. दलितांना त्याचे धार्मिक सामाजिक आर्थिक अधिकारच नाही तर माणुस म्हणून जगण्याचे अधिकार बाबासाहेबांनी प्रात करुन दिले स्वातंत्र्यपूर्व काळात दलितांना मिळालेल्या सवलती त्यांच्या या उत्कर्षाचे पहिले पाऊल होत्या. स्वतंत्र भारताच्या संविधानातच दलितांना त्याच्या न्याय हक्काची तरतुद करण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला. कायदयापुढे सर्व समान, सरकारी निमसरकारी नोकऱ्यात दलितांना सवलता शोषणाविरुध्दचा अधिकार धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दलितांना देण्यात आला. घटनात्मक सवलतीच स्वातंत्र्योत्तर काळात मिळाल्याने दलित चळवळीचा संपूर्ण चेहराच बदलून गेला तो अभ्यासणे येथे क्रम प्राप्त ठरते.

**संशोधन पध्दत :-**

सदर शोधनिंबध लिहीतांना ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला. प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करुन वस्तुनिष्ठ लेखन करण्यात आले.

**धर्मातर दलित चळवळीची फलश्रुती :-**

दि.१३ ऑक्टोबर १९३५ रोजी डॉ. बाबासाहेबला धर्मातराची घोषण केली दुदैवाने मी हिन्दु म्हणून जन्मास आलो तरी हिंदु म्हणून मरणार नाही.[१] असे येवला येथील सभेत बाबासाहेबांनी स्पष्ट केले. आपल्या लाखो अनुयायांसोबत बौध्द धर्मीची दिक्षा घेतली. वर्षानुवर्ष ज्या हिन्दू समाजात अतिशय हीन वागणूक दलितांना मिळत होती ती दुर झाली व समानतेवर आधारित धर्म उभा राहिता.

**विदर्भात धर्मातर समारंभ :-**

दिक्षा देणे म्हटले की पुन्हा विधी व पध्दत आलीच. हिन्दू धर्मात जसे कर्मकांड आहे तसे बौध्द धर्मात शिरु नये म्हणून डॉ. आंबेडकरांनी नागपूरचा दिक्षा समारंभात स्पष्ट केले की प्रत्येक व्यक्तीला दिक्षा देण्याचा अधिकार आहे.[२] बाबासाहेबांच्या धर्मांतर सोहळयासाठी प्रचंड उत्सुकता दलित बाधवांना होती. खरं म्हणजे हा दलिताच्या मुक्तीचा तो दिवस होता. हजारो वर्षापासून उपेक्षित समाज स्वतंत्र धर्म स्थापण करणार होता. बाबासाहेबाच्या धर्मातराला पाठीवा विदर्भातून व्यक्त करण्यात आला तसे ठराव घेण्यात आले.

धर्मातरचा एक भाग असलेली व बाबासाहेबांनी बौध्दजन नावाची समिती स्थापण केली होती तो पुढे १९५४ पासून बौध्द महासभा म्हणून ओळखली जावू लागली.[३] बौध्दजन समितीच्या सभा विदर्भात गावागावत स्थापन करण्यात आल्या धर्मांतर सोहळयासाठी विदर्भाचे जास्त योगदान आहे. १९५५-५६ या एका वर्षात विदर्भात ज्या दलित चळवळी संदर्भात सभा झाल्या त्या बौध्द धर्मांचे प्रमुख स्थान दिसून येतो. उदाहरणार्थ कारंजा येथे १८ ऑगस्ट १९५६ रोजी वऱ्हाड प्रांतीक शेडुल्ड कास्ट फेडरेशन च्या वतीने सभा आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये बौध्द जन समितीचा वऱ्हाडाच प्रचार करण्याचे ठरवण्यात आले.

१४ ऑक्टो १९५६ ला बाबासाहेबांनी आपल्या लाखो अनुयायायाच्या सोबत बौध्द धर्मात प्रवेश घेतला या समारंभासाठी मोठया प्रमाणावर विदर्भातील बांधव हजर होते. समाजामध्ये जागृती करुन नागपूरपर्यत जाण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. शेडुल्ड कास्ट फेडरेशन बाबतीने लोकांना सभारभासाठी उपस्थित राहण्यासाठी आवाहन करण्यात आले. विदर्भात घरोघरी दिक्षा समारंभांचे चैतन्य तत्कालीक काळात पहायला मिळाले.

विदर्भात दिक्षा समारंभानंतर अनेक सभा घेण्यात आले जे लोक नागपूर पर्यंत पोहचले नाही किवा पोहचू शकले नाही. त्याच्यासाठी अनेक सोहळे दलित चळवळीच्या माध्यमातून घेण्यात आले. दि. २४ जानेवारी १९५७ रोजी बडनेरा येथे बौध्द धर्मदिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दोन लाख लोक उपस्थित होते. नागपूर, यवतमाळ, अकोला, खामगांव इत्यादी ठिकाणी धम्मदिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात बौध्द धर्मदिक्षा समारंभासोबतच बाबासाहेबांच्या तत्वज्ञानाचा प्रचार करण्यात आला. त्यांचे विचार घराघरात पोहचवण्यात आले. भारतीय बौध्द महासभा सक्रीयपणे धर्मांतर समारंभात भाग घेत

असे विदर्भातील अकोला नागपूर धर्मांतरची केन्द्र होती. अकोल येथील माटे मैदानावर प्रचंड धर्मदिक्षा समांरभ आयोजित करण्यात आला. हजारो बौध्द बाधवांना धम्मदिक्षा देण्यात आली. खामगाव येथील कॉंग्रेस भवन मैदानावर बौध्द धम्मदिद्येचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. १६ ऑक्टोबर १९५६ ला नागपूर समांरभनिकर दुसरा धम्मदिद्या सोहळा संपन्न झाला विशेष बाब म्हणजे बाबासाहेबांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा संपन्न झाला. [४] विदर्भानच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर धम्मदिक्षा सोहळे पार पडले विदर्भामयये कामुंझा (वझरखेड), तिवसा, मंगरुळ (जि.अकोला) अकोला उंद्री (बुलडाणा), बुलडाणा, खामगांव, विडुळ (यवतमाळ) सभा संपन्न झाल्या.

**प्रत्यक्ष प्रचार व प्रसार :-**

संपूर्ण विदर्भात बौध्द धर्माचा प्रचार करण्याचे आवाहन स्विकारण्यात आले. म्हणूनच विदर्भ कास्ट फेडरेशनच्या विद्यमाने तेल्हारा येथे सभा घेण्यात आली. बाळापूर (बटवाडी बु.) येथे झालेल्या सभेत बौध्द धर्माचा प्रसार करण्यात चर्चा करण्यात आली. त्यानंतर आकोट, अमरावती येथील आसारा, कामरगाव, चांदुरबाजार, मेहकर येथील राहेरी बुद्रुक येथे विविध सभा संपन्न झाला धम्म चळवळ, सरकारी कर्मचाऱ्याकडून दलितांची होत असलेली अवहेलना, वा दलितांना दिलेली पारंपारिक कामे न करणे, त्यांना स्वस्त धान्य मिळावे, राजकीय अधिकार मिळावे. इ. बाबी प्रकर्षाने या सभामधून चर्चील्या गेल्यात. यातून पुढे दलितातील न्युनगंड दूर होवून सामाजिक उत्थानास सुरुवात झाली.


**सारांश :-**

स्वातंत्र्योत्तर धर्मांतर चळवळ दलीत चळवळीचे एक अभिन्न अंग होते. धर्मांतर केवळ धर्मातून विभक्त होणे नव्हते तर असमानता धर्मास कमकुवत करु शकते हे सर्व जगाला दिसून आले. ज्या धर्मात लोकांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारल्या गेला त्या धर्मापासून विभक्त व समानेतवर आधारित धर्माचा स्विकार केला. अनेक प्रथा परंपरा ज्या धर्मासाठी घातक होत्या त्या सोडून विज्ञानवाद बौध्द धर्माने स्विकारला जो आज धर्माच्या प्रगतीचे निदर्शक ठरले. आज घटनेने तर सर्वांना समान मानले आहे. परंतू त्याचे मनोधर्य उंचावले वर्षानुवर्ष ज्या जाचक रुढी व परंपरेत समाज भरडला गेला होता त्यांना तिलांजली मिळाली व समानतेचे एक नवीन पर्व या धर्मांतरापासून सुरु झाले.

**संदर्भ ग्रंथ :-**


1. मुन, वसंत (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ वा. भाग १ , पृष्ट ४३२
2. मस्के बी आर., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नभ प्रकाशन, अमरावती, २०१२, पृ २८७
3. खैरमोडे, चं.भा.डॉ. भिमराव रामजी आंबेडकर लेखन व भाषणे खंडा १८ वा भाग १, २००२ पृ. १७३
4. कित्ता, खंड, १२ वा पृ. ३३०
5. मस्के बी.आर.पुर्वोक्त, पृ. २९४

**Dr. N. D. Deshmukh**



MAH MUL/03051/2012 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 013
ISSN: 2319 9318

14) ON THE IDEA OF COMEDY AND OF THE USES OF THE COMIC SPIRIT
Dr.Mrs.Nilima Tidke, Akola || 60

15) Humanism: The Centripetal Force of the Universe
Dr.Jagruti S. Vyas, Amravati || 63

16) NECTAR IN A SIEVE NOURISHED BY HUMANITARIAN PERSPECTIVE
Dr. Varsha Gawande, Amravati || 66

17) A REALISTIC PORTRAYAL OF THE BLACKS IN THE BLACK BOY
Dr. Ulka S. Wadekar, Amravati || 68

18) Humanism and Treatment of Nature in Gitanjali
Dr. Smita R. Deshmukh, Amravati, M.S. India || 72

19) The White Tiger : An Urge for Human Dignity
Dr. Satyendra B. Gadpayale, Dist. Amravati (MS) || 75

20) Humanism in Mulk Raj Anand's Untouchable
Dr. Nilima Deshmukh, Khamgaon, Maharashtra || 78

21) Humanism in Mulk Raj Anand's 'Untouchable'
Dr. Mrs. Savita D. Thakare, Amravati || 79

22) HUMANITARIAN PERSPECTIVES IN " THE OLD WOMAN AND THE COW"
Dr. Mariam Thomas, Amravati || 82

23) Humanitarian Approach in Tagore's Gitanjali and Ezekiel's Poetry
Dr. G. O. Jondhalekar, Dist. Akola || 85

24) Humanism in Indian English literature
Dr. Beena V. Rathi, Anjangaon Surji || 88

25) Humanism in Mulk Raj Anand's Novels
Dr. Aupama Prakash Pol, Kurduwadi || 91

26) Humanism in Literature: Three Indian English Writers to read
Dr. Aparna Tulshiram Sarode, Dist. Amravati || 94

27) MULK RAJ ANAND AND HUMANISM
DR. ANIL M. KATROJWAR, DIST.: AMRAVATI || 98

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® | February 2018 Special Issue | 078

Darkness, and of becoming his own man. He instates in Balram the goal of becoming one of those men who are in the light. He says –

"My whole life, I have been treated like a donkey. All I want is that one son of mine – at least one – should live like a man." [10]

Balram frees himself from the Darkness by killing his employer, Ashok. Balram reflects after killing his employer –

"I have made it! I' had broken out of the coop!"[11]

Perhaps the last line in the novel speaks the ultimate messages when Balram utters –

"I'll say it was all worthwhile to know, just for a day, just for an hour, just for a minute, what it means not to be servant."[12]

**References:-**

1. Adiga, Aravind (2008). The White Tiger , Harper Collins Publishers India, p.35
2. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.86
3. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.56
4. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.56
5. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.51
6. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.14
7. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.20
8. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.147
9. Young, Victoria, "Novel About India Wins Man Booker Prize" Retrieved 8 May 2012.
10. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.26
11. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.275
12. Adiga, Aravind (2008). The White Tiger, Harper Collins Publishers India, p.321

20

# Humanism in Mulk Raj Anand's Untouchable

**Dr. Nilima Deshmukh**
Asst. Professor,
S.M.B.S. Arts College, Khamgaon, Maharashtra

**********

**Abstract**

Mulk Raj Anand was one of the pioneers of Indian English novel. Anand did not believe in the theory of art for art's sake. In fact, he uses his art for the service of humanity. His novels and short stories reveal the author on a mission to appeal for modern egalitarian morals. Humanism is a persistent theme in his novels. Untouchable is his creation in which he has presented the grossly unjust practice of caste discrimination.

**Introduction**

Humanism is defined as a "System or mode of thought or action in which human interest, values and dignity predominate." [1] It rejects religious beliefs and emphasizes humans and their capacities and worth. Anand's observation of the highly stratified social structure around him; the blind adherence to socially oppressive practices fuelled in him a passionate social faith. His fiction was influenced by what he calls "the double burden on my shoulders, the Alps of the European tradition and the Himalaya of my Indian Past."[2]

Anand's Humanism

Anand was a great humanist. His insistence on the dignity of man irrespective of wealth, caste or creed characterises his humanism. He uses his art as a crusade against superstition, feudalism and imperialism. In his belief in the supremacy of man, he rejects God, fate and religion. His novels plead for practice

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 079

of love and compassion for the underdog to end misery and unhappiness. He also poses faith in scientific advances to bring objectivity in human relation.

**Humanism in Untouchable**

Anand's first novel, Untouchable reveals his humanitarian compassion for the under-privileged. The novel brings before us the trials and tribulations that the Hindu caste system inflicts on the untouchables through the portrayal of a poor sweeper boy, Bakha. The evil of caste system and its disastrous effects on human dignity is the central theme of this novel.

The novel depicts a day in the life of Bakha, an untouchable boy of eighteen. Bakha is a sweeper and expected to wear the scantiest of clothes befitting his lowly status. However, the young boy wishes to dress like the upper caste people, 'apeing the high caste people'. This is looked down upon by the caste Hindus. Only Charat Singh feels kindly towards the boy. He even realizes that the boy does his filthy job with a certain dignity but even he does not relax his demeanour enough to discard "six thousand years of racial and class superiority". [33]

https://books.google.co.in /Untouchable Mulk Raj Anand accessed 15-02-2018 3 : 30 pm.

❑❑❑

21

# Humanism in Mulk Raj Anand's 'Untouchable'

**Dr. Mrs. Savita D. Thakare**
Assistant Professor, Dept. of English,
Matoshree Vimalabai Deshmukh
Mahavidyalaya, Amravati

**********

**Abstract :-**

Indian writer Mulk Raj Anand is described as a novelist whose province is human nature" in the International Journal of English Language, Literature and Humanities. His short stories and novels are known for their depiction of oppression and poverty in lower social classes of the traditional caste system. His first novel, 'Untouchable', follows the life of a young man considered "Untouchable" because of his work as a toilet cleaner. Mulk Raj Anand was one of the founding fathers of Indian English novel writing. For him, message of a work of art was no less important than the art itself. In other words, humanism as governing principle of his writings finds clear reflection in his short stories and novels.

'Untouchable' is significant for its simple and unaffected style which is reflection of the novelists deep sincerity and complete absence of sentimentalism. Bakha's life is a tragedy which invites our sympathy. He is the central character and at once an individual in flesh and blood, true to life, as well as, a type representing hundreds and thousands of his like. At the same time the novel ends in an optimistic note in the sense that a change in the life of untouchables is, after all possible.

Anand's humanism may be defined as a system of thought in which human interest, values, and dignity are held dominant. It implies

**Dr. H. P. Yeole**


Vidyawarta
UGC
Jr.No.62759
UGC Approved Refereed Journal
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता ®
रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०१८
भारतीय विद्यामंदिर, अमरावतीद्वारा संचलित
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती
(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)
व
आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
राष्ट्रीय चर्चासत्र
"मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन"
प्राचार्य
जी.एस.मेश्राम
भारतीय महाविद्यालय,मोर्शी
ता.मोर्शी,जि.अमरावती
मुख्य संपादक
प्रा.विराग गावंडे
संचालक
आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट
ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती
संपादक
प्रा.डॉ.भगवान जे.साबळे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय,
मार्शी, जि.अमरावती
आयोजक
मराठी विभाग
भारतीय महाविद्यालय, मोर्शी,जि.अमरावती
आणि
आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इनिस्टट्यूट, अमरावती

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® | February 2018 Special Issue | 013

13) पालीवंस साहित्यातील महावंसाचे सांस्कृतिक अध्ययन
प्रा. संदीप रा. भालेराव, नागपूर || 53

14) संत तुकाराम आणि त्यांची अभंग गाथा — एक अभ्यास
डॉ. एम. पी. खेडेकर, जि.वाशिम || 55

15) ग्रामीण कविता : कवी ना. घ. देशपांडे
प्रा. अनुप नांदगावकर, जि. वाशिम || 59

16) आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे योगदान
प्रा. नितीन जगदिश टेकाम, पांढरकवडा || 61

17) आदिवासी कवितेतील स्त्रीदर्शन
डॉ. प्रवीण व. काळे, जि.वर्धा || 65

18) बहीणाबाईच्या कवितेतील जीवनाविषयक तत्वज्ञान
प्रा. सारिका दादाराव पाचराउत, पातूर || 66

19) कुटुंबकवी: संत चोखामेळा
प्रा. प्रवीण घारपुरे, जि. नागपूर || 69

20) पाली साहित्यातील थेरीगाथामधील स्त्रीजीवन- एक अध्ययन
प्रा. कविता एन. खरात, नागपूर || 74

21) तुकाराम एक भावकवी
सहा.प्रा.शशिकांत वि. काळे, जि. अमरावती || 76

22) महानुभावीय साहित्य
प्रा. हर्षा पं.येवले, जि.बुलडाणा || 79

23) ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन
डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे, चिखली || 82

24) लीळाचरित्र : हिराईसा पिढीपाठोत्तर प्रक्रियेचा शोध
डॉ. केशव गाडबेल, अमरावती || 85

25) साहित्यातील मानवतावादी दृष्टिकोन
प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत, जि.नागपूर || 87

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 079

22

# महानुभावीय साहित्य

प्रा. हर्षा पं.येवले (सौ.हर्षा एन.ढाले)
मराठी विभाग प्रमुख,
स.म.स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय,
खामगाव, जि.बुलडाणा

***********

महाराष्ट्राच्या साहित्य विकास निर्मितीत महानुभाव पंथीय साहित्याचा महत्वाचा वाटा आहे. महानुभाव पंथ हा महाराष्ट्रातील एक प्रमुख आणि प्राचीन संप्रदाय आहे. महानुभाव पंथ तेराव्या शतकात उदयास आला असून या पंथातील अनुयायांनी मराठी भाषेत साहित्यनिर्मिती केलेली आहे. महानुभाव पंथात निर्माण झालेले साहित्य हे महाराष्ट्राचे वैभव तसेच ते सांस्कृतिक धन आहे. महानुभावीय साहित्याने साहित्य विकासात मोठी भर घातलेली दिसून येते. मानवाचे सांस्कृतिक रुप म्हणजे साहित्य असते आणि साहित्याचा संबंध इतिहास, धर्मशास्त्र, संस्कृती समाजशास्त्र, अध्यात्मशास्त्र तत्वज्ञान या शास्त्रांशी येत असतो. महानुभाव पंथातील साहित्याने साहित्याच्या विकासात मोलाची भर घातलेली आहे. आज उपलब्ध व प्रसिध्द झालेल्या विपूल साधनसामुग्रीवरुन मराठी काव्यरचनेला प्रथम महानुभावीय कवींनी आरंभ केला. मराठी वाङ्मयाच्या उद्यानातील अनेक विभागांची फुलझाडे सर्वांच्या आधी या पंथाने लावली. काव्यप्रांतातही महानुभावीय साहित्यिकांनी आद्यग्रंथ-कर्तृत्वाच्या बाबतीत स्पृहणीय कामगिरी करुन दाखविली आहे.

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाची स्थापना केली. ज्ञानेश्वरपूर्वकाळातच काही रचना महानुभावीय कवी-कवयित्रींनी केलेली दिसून येते. केशवदेव व्यास व दामोदर पंडित हे कवी व महदंबा हया कवयित्रींनी जी काव्यरचना केली ती अत्यंत प्रसिध्द आहे. विदर्भातील ऋध्दिपूर या खेडे गावात महानुभाव पंथाची संस्थापना झाली. या खेडे गावातूनच महानुभावीय साहित्याला चालना मिळाली. या पंथातील अनेक कवींना ऋध्दिपूरमधूनच आपल्या काव्य-कर्तृत्वाला स्फूर्ती मिळाली.

महानुभाव वाङ्मयाची हस्त-लिखिते, पोथ्या यांचा संग्रह बराचसा उपलब्ध आहे. अनेक महानुभाव विद्वानांनी आपल्या पंथातील पोथ्यांचा संग्रह केलेला आहे. त्या पोथ्या माहूर व ऋध्दिपूर येथील मठांत मोठ्या प्रमाणात आढळून येतात. माहूर येथील सुप्रसिध्द महंत श्रीदत्तलक्षराज माहूरकर, ऋध्दिपूर येथील महंत श्रीगोपीराज ऊर्फ मुशाफीर महानुभव ,श्रीकृष्णराजदादा लासूरकर पारिमांडल्य,श्री लोणकर महानुभाव,श्रीगोविंदराज गुरु रश्रीराधेराज महानुभाव, श्री गंगाधर शास्त्री महानुभाव, श्रीतळेगावकर महानुभाव, श्री शाहगडकर महानुभाव, श्री पाचराऊत महानुभाव, श्रीभगतराज महानुभाव इत्यादींचे हस्त-लिखित ग्रंथ व पोथ्यांचा संग्रह हजारोंच्या संख्येने आहे.

महानुभाव संप्रदायातीलअनेक लेखकांनी चरित्रात्मक साहित्य निर्मिती केली. श्रीकृष्ण, श्री दत्तात्रेय ,श्री चक्रपाणी, श्री गोविंदप्रभू व श्रीचक्रधरस्वामी या वंदनीय अवतारांचे चरित्रलेखन करण्यात आले आहे. हे त्यांचे चरित्रग्रंथ मराठी साहित्याच्या इतिहासात सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र,स्थानपोथी स्मृतिस्थळ हे महानुभावीय ग्रंथ महाराष्ट्रातील समाजजीवनाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत.

महानुभाव पंथाचे मुख्य आधारस्तंभ म्हणजे 'लीळाचरित्र' होय. डॉ. सदानंद मोरे यांच्या मते, 'लीळाचरित्र' हा ग्रंथ महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आहे. यादवकालीन समाजाचे जवळ जवळ सर्वांगीण दर्शन घडविणारा हा ग्रंथ म्हणजे मराठी भाषेचे अपूर्व अमूल्य लेणे आहे. यादवकालीन मराठी गद्याचे ते प्रौढ आणि प्रगल्भ रुप आहे. लीळाचरित्र म्हणजे श्री चक्रधरस्वामींचा चरित्रग्रंथ होय. या ग्रंथाचे लेखक म्हाइंभट. लीळाचरित्र हा ग्रंथ अनेक दृष्टीने महत्वपूर्ण आहे. 'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील आद्य गद्यग्रंथ आहे. प्राचीन मराठी गद्याचा सुंदर विलास,भाषेचा डौल या ग्रंथात पहावयास मिळतो. लीळाचरित्राचे स्वरुप हे संकलनात्मक आणि संशोधनात्मक आहे. हा ग्रंथ एकांक,पूवार्ध,आणि उत्तरार्ध अशा तीन विभागात विभागले गेले आहे.लीळा म्हणजे श्रीचक्रधरांच्या आयुष्यातील घटना होत. या ग्रंथात लौकिक जीवनाचे तसेच तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण आहे.

'लीळाचरित्र' हा महानुभव पंथाचा मुख्य आधार ग्रंथ आहे. या ग्रंथाचे लेखक म्हाइंभट होते. ते व्युत्पन्न पंडित होते. श्रीचक्रधर प्रभूंनी उत्तरपंथे गमन केल्यानंतर पंथीय मंडळी ऋध्दिपूर (रितपूर, ता.मोर्शी,जि.अमरावती) येथे राहत होती. त्यावेळी नागदेवाचार्य हे श्रीचक्रधर स्वामी यांच्या लीळा सांगत आणि चिंतन करीत असत. त्यावेळी नागदेवांनी लीळा सांगाव्यात आणि म्हाइंभटांनी त्या लिहाव्यात असा उपक्रम सुरु झाला. ऋध्दिपूर येथील वाजेश्वराच्या मंदिरात नागदेवाचार्य लीळा सांगत आणि म्हाइंभट त्या लिहित असत. पण काही लीळा नागदेवाचार्यांच्या समक्ष घडल्या नाहीत. त्यावेळी

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 080

म्हाइंभटानी त्या त्या गावी जाऊन संबधीत व्यक्तिकडून विचारुन त्या लिहून घेतल्या. अतिशय कष्टपूर्वक त्यांनी लीळा संग्रहित केल्या. त्या लीळा नागदेव भटांच्या अविद्यमान घडल्या त्यांना पूर्वाध आणि ज्या त्यांच्या विद्यमानी घडल्या त्यांना उत्तरार्ध असे नाव दिले. याप्रमाणे लीळाचरित्राची निर्मितीच एक अत्यंत श्रध्दायुक्त अशा शोध प्रकल्पातून झाली. त्यामुळे लीळाचरित्र हा ग्रंथच काटेकोर आणि साक्षेपी संशोधनाचा आदर्श आहे. परंतु त्यावेळी दिल्ली सुलतानाच्या आक्रमणामुळे लीळाचरित्राची मुळ पोथी धाडीत नाहिशी झाली. पण महानुभाव पंथात लीळाचरित्र पाठ करण्याचा प्रघात होता. त्यावेळी कमळाइसाची शिष्या हिराइसा ही अचाट प्रज्ञेची एकपाठी तपस्विनी होती. त्यावेळी हिराइसाने लीळाचरित्र पुनर्लेखन केले. हाच लीळाचरित्राचा सर्वात जुना पाठ आहे. याला पिढीपाठ असे म्हणतात.

तसेच श्रीगोविंदप्रभू चरित्र हा महानुभाव साहित्यातील महत्वपूर्ण चरित्र ग्रंथ आहे. या ग्रंथालाच 'ऋध्दिपूरलीळा' असे म्हणतात. यामध्ये गोविंदप्रभूंचा जन्म,बालपण, शिक्षण आणि मृत्यू याबाबत माहिती आहे. यातील लीळा ही स्वतंत्र असून त्यातील प्रसंग चित्रण रोमहर्षक आहे. सर्व लीळा कथात्मक पध्दतीने सांगितलेल्या आहे. महानुभावीय साहित्यात या ग्रंथाला विशेष महत्व आहे.

'स्मृतिस्थळ' या ग्रंथात श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या अनुयायांना दिलेली आदर्श शिकवण, विचार यांचा समावेश आहे. 'स्मृतिस्थळ' या ग्रंथात महानुभावीय साहित्यिकांनी आपआपल्या अनुभवातील स्मृती लिहून काढल्या. दामोदर पंडित,नरेंद्र पंडित, म्हाइंभट यासारख्या अनेक महानुभावीय पंथीयांच्या आयुष्यातील घटना,त्यांच्या निष्ठा तसेच त्यांच्या जीवनचरित्राची माहिती ही 'स्मृतिस्थळ' या ग्रंथातून मिळते.

महानुभावीय साहित्यात तत्वज्ञानपर आधारित काही ग्रंथ आढळून येतात. त्यामध्ये सूत्रपाठ, दृष्टांतपाठ यांचा समावेश आहे. 'सूत्रपाठ' या ग्रंथाची निर्मिती केशिराजबासांनी केलेली आहे. हा ग्रंथ महानुभाव तत्वज्ञानाचा पाया आहे. सूत्रपाठातील प्रत्येक वचनावर, सूत्रावर महानुभाव पंथाचा प्रगाढ विश्वास आहे. 'दृष्टांतपाठ' या ग्रंथाचे संकलन केशिराजबासांनीच केलेले आहे. यामध्ये प्रत्येक दृष्टांत सूत्र,दृष्टांत व दार्ष्टान्तिक या स्वरुपात मांडलेले आहे. दृष्टांपाठात एकूण एकशे चौदा दृष्टांत आहे. या ग्रंथात अतिशय सोप्या भाषेतून मनोरंजकता निर्माण केलेली आहे.

महानुभावीय साहित्यात अनेक बुध्दिमान व प्रतिभाशाली कवी होऊन गेले. पैकी भास्करभट्ट बोरीकर हे विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यातील बोरी या गावचे होते. त्यांनी 'शिशुपालवध, उध्दवगीता, पूजावसार, तीन अष्टके इत्यादी ग्रंथ लिहिले. मुनी केशिराजांचा 'मूर्तिप्रकाश' हा एक उपलब्ध पण अमुद्रित ग्रंथ प्रसिध्द आहे. महानुभाव पंथाचाच पण अस्सल वऱ्हाडी कवी म्हणजे पंडित विश्वनाथ हा होय. त्यांच्या 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथात अध्यात्म व तात्विक विवेचन काव्यमय पध्दतीने आलेले आहे. महदंबा ही महानुभाव पंथातील प्रसिध्द कवयित्री सर्वश्रुत आहे. तिचे 'धवळे' व 'मातृकी रुक्मिणी-स्वयंवर' हे ग्रंथ महानुभावीय साहित्यात प्रसिध्द आहे.

गुप्त लिपी हे महानुभाव पंथाचे आगळेवेगळे वैशिष्ट्ये आहे. सकळी सुंदरी, पारिमांडल्य, अंक, वज्र, मनोहर, शिरोलिपी अशा एकूण अठ्ठावीस लिप्यांची नोंद महानुभाव साहित्यात आढळते. पण यापैकी सकळी सुंदरी आणि पारिमांडल्य या लिप्यांचे प्रचलन अधिक होते. सर्वात जास्त प्रचलित सकळी लिपी होती. वरील लिपीची निर्मिती काळ वि.भि.कोलते आणि यू.म.पठाण यांनी अंदाजे शके १२७५ (इ.सं. १९५३) असा मानला आहे. त्यामुळे महानुभव पंथाचे साहित्य हे गुप्त लिपींच्या वज्रकपाटात बंद झाले होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत गुप्त लिप्यांच्या वज्रकपाटात बंद असलेले हे साहित्य आता अनेक संशोधकांनी मुक्त करण्यात यश मिळविले आहे. अनेक महानुभव संत, महंत, संशोधक, अभ्यासक पंडित यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातलेले दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने वि.का.राजवाडे, लोकमान्य टिळक, वि.ल.भावे, श्रीगोपिराज रावधर पंजाबी, संतोषमुनी कृष्णदास, भास्कर कवी, गोविंद कानडे, महंत दत्तलक्षराज, महंत श्रीगोपिराज मुशाफीर, रामकृष्ण भांडारकर, य.खु. देशपांडे, वा.ना.देशपांडे, ह.ना.नेने, नी.ब.मवाळकर, वि.भि.कोलते, श.गो. तुळपुळे ,यु. म.पठाण,महंत श्रीनाथगजबाबा, कृष्णदास महानुभव, चंद्रकांत निंभोरकर, पुरुषोत्तम नागपुरे, सु.म. डोळके,ब. दि. कुळकर्णी, ब. स. जोशी, उषा देशमुख, श.बो मेश्राम, मुरलीधर कोवळकर, कन्हैया कुंदप, बाळकृष्ण अंजनगावकर, म.रा. जोशी, कृष्णराजशास्त्री शिक्रापूरकर, ओंकारदादा कपाटे, कुंदा चौधरी, देविसिहंजी चौहान, दि.को. माळवे, आशा कर्दळे, विदेशी लेखक इयन रिसाईड्, ॲनफेल्डहाऊस, कुझेनत्सीव आणि ब्रम्हानंद देशपांडे इत्यादींचे योगदान महानुभावीय साहित्य संशोधनात महत्वाचे आहे. या सर्वांच्या अथक परिश्रमातून मराठीच्या भांडारात तसेच महानुभाव साहित्य निर्मितीत देदिप्यमान रत्नांची भर पडली आहे. महानुभावीय साहित्य गुप्त लिपीच्या आवरणात बंद असल्यामुळे मराठी शब्दांची शुध्द रुपे आणि अचूक अर्थ, तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्थिती आपणास प्राप्त होते.

महानुभाव पंथीय गुप्त लिपीचा उलगडा इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी आपल्या लोकविलक्षण बुध्दिसामर्थ्याने केला आहे. महानुभाव साहित्याविषयी त्यांचा 'एक जुने महानुभावी काव्य' हा

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 081

लेख १९०३ मध्ये प्रकाशित झाला होता.

विदर्भात बुलडाणा जिल्हयात खामगाव येथे श्री गोपिराज राजधर पंजाबी महानुभाव यांनी पाठाची पोथी शिळाप्रेसवर छापून प्रकाशित केली. तिची एक जीर्ण प्रत वि.भि.कोलते यांना पहावयास मिळाली होती. पण तिची आधीची आणि शेवटची पाने गहाळ झाली होती. त्यामुळे छापखाना आणि मुद्रणवर्ष कळू शकले नाही. खामगाव येथून सिध्दान्तकल्पतरु या छापखाण्यातून संतोषमुनी कृष्णदास यांचे 'रुक्मिणीस्वयंवर' (सन १८८९), भास्कर कवीचे 'भागवतसार चाळीसी' हे काव्य (सन१८९१) छापण्यात आले होते. या शिवाय पंचरत्नी, ध्यानामृत, मंत्रश्लोकीसह,दत्तात्रेय कवन आदि ग्रंथ छापण्यात आले.

य. खु. देशपांडे यांनी खऱ्या अर्थाने महानुभाव पंथीय साहित्याच्या संशोधनाच्या कार्याला प्रारंभ केला. त्यांनी महानुभावीय पोथ्या मिळविण्यासाठी अगदी काबूल, कंदाहरपर्यंत प्रवास केला. आत्यांतिक जिज्ञासुपणे ते महानुभाव पंथीय साहित्याच्या संशोधनात मग्न झाले. त्यांनी महानुभावीय मराठी वाङ्मय हा अपूर्व ग्रंथ लिहिला. तो सप्टेंबर, १९२५ मध्ये विदर्भ साहित्य ग्रंथमाला पुष्प पहिले म्हणून प्रकाशित झाला. या ग्रंथाचा आधार घेतल्याशिवाय कोणत्याही संशोधकाला पुढे पाऊल टाकता येत नाही. इतका तो महत्वाचा संदर्भ ग्रंथ झाला आहे. य.खु.देशपांडे यांनी यवतमाळ येथे 'शारदाश्रम' नामक संशोधन संस्था स्थापन केली. वा.ना.देशपांडे आणि वि.भि.कोलते हे या संस्थेचे सदस्य होते. य.खु.देशपांडे यांनी नारो व्यास बहाळिये यांचे ऋध्दिपूरवर्णन, भीष्माचार्य हे ग्रंथ प्रकाशित केले. या पद्यग्रंथाला त्यांनी ऋध्दिपूर चरित्र गद्य ग्रंथातील उताऱ्यांची जोड दिली. याशिवाय त्यांनी चक्रपाणी चरित्रही प्रकाशित केले. शिवाय त्यांनी स्फुटलेखही लिहिले. महानुभावीय वाङ्मयात आलेले यादवकालीन ऐतिहासिक उल्लेख या लेखात रामदेवराय यादव पकडला जाणे, नरेंद्र आणि रामदेव, कामाईसा सती प्रकरण आदि महत्वाचा भाग आहे.

**सारांश -**

महानुभावीय साहित्य हे प्राचीन साहित्य आहे. महानुभावीय साहित्य हा अनमोल ठेवा आहे. त्याचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. महानुभावीय साहित्याने साहित्याच्या विकासात मोलाची भर घातलेली दिसून येते. महानुभाव संप्रदायातील अनेक लेखकांनी चरित्रात्मक साहित्य निर्मिती केलेली आहे. महानुभावीय साहित्यातील अनेक प्रज्ञावंत कवींनी महानुभावीय साहित्य संपन्न केलेले आहे.तसेच गुप्त लिपी हे महानुभाव पंथाचे आगळेवेगळे वैशिष्ट आहे. अजूनही या साहित्याचा पूर्णपणे शोध-बोध लागलेला दिसूत नाही. काळाच्या ओघात महानुभावीय पोथ्या, लिपी, विविध महामुनींचे हस्तलिखिते लुप्त झालेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. कोलते वि.भि., प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर, कुलसचिव. अमरावती'विद्यापीठ, अमरावती, १९९६

२. कोलते वि. भि., महानुभाव संशोधन खंड १ ला ,अरुण प्रकाशन, मलकापूर, १९६२.

३. कोलते वि. भि., महानुभाव संशोधन खंड २ रा, अरुण प्रकाशन, मलकापूर, १९८४.

४. प्रियोळकर अ.का. महानुभाव इतिहास, मराठी ग्रंथ संग्राहालय, मुंबई, १९६६

५. शहा मु. ब., इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, समग्र साहित्य, खंड २ रा. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८.

६. देशपांडे ब्रम्हानंद, महानुभावीय शोधनिबंध, खंड १ ला, राऊळ प्रकाशन, औरंगाबाद, २००५

७. अवलगावकर रमेश, ढेरे अरुणा, महानुभाव व संत वाङ्मय, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक.

८. तुळपुळे शं.गो., महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय, व्हीनस प्रकाशन, पुणे.

९. तुळपुळे शं.गो., घारपुरे कुमुदिनी, दृष्टांतपाठ, सुविचार प्रकाशन, पुणे.

१०. तुळपुळे शं. गो., स्मृतिस्थळ, कुळकर्णी प्रकाशन, पुणे.

११. बसवंते माधव, अक्षरगाथा, त्रैमासिक यातील लेख, संपादक: मा. मा. जाधव, बळीवंश प्रकाशन, नांदेड ऑक्टोबर ,२०१०.

❑❑❑